## पुणे लोहमार्ग पोलीस भरती 2019 शारीरीक चाचणीचे गुण :–

पुणे लोहमार्ग पोलीस भरती परिक्षा 2019 चे दिनांक : 17/10/2021 रोजी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षेची गुणवत्ता यादी यापुर्वी दि : 25/10/2021 रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार दिनांकः 17, 18 व 19 जानेवारी 2022 रोजी गुणवत्ता यादीतील उमेदवारांची शारीरिक चाचणी घेण्यात आली होती .यासोबत शारिरीक चाचणीची गुणपत्रिका परिशिष्ठ क्रंमाक 1 मध्ये व परिशिष्ठ क्रंमाक 2 मध्ये जोडलेली आहे. उमेदवारांनी त्याचे अवलोकन करावे. त्याबददल काही अक्षेप असल्यास ते दिनांक 22 जानेवारी 2022 चे 17/00 वाजेपर्यंत email id - sp.railways.pune@mahapolice.gov.in वर नोंदवावे.

एकुण 77 पदांच्या भरतीबाबत दि:04/09/2019 मध्ये जाहिरात दिली गेली होती सदरील जाहिराती मध्ये अनुसुचित जाती, वि.मा.प्र., इमाव /EWS व खुला अशा प्रवर्गातील उमेदवारांनी आवेदन पत्र भरावयाचे होते.

पुणे लोहमार्ग पोलीसची जाहिरात दि.04/09/2019 मधील 14.4 व 14.9 क्रमांकाची तरतुद परिच्छेद आहे. **परिच्छेद – 14.4 " निवडीच्या कोणत्याही टप्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.(निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी)अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढल्यास,ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती/अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभुल केल्यामुळे त्यांचेवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येऊन त्यांच्या विरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल. व 14.9.च्या** तरतुदीनुसार **–सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवडप्रक्रियेतुन वगळण्यात येईल.पात्रता धारण न करणा–या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यापर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष भरती समिती यांनी राखून ठेवली आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

वरील तरतुदीनुसार इतर प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी त्यांच्या सबंधित प्रवर्गातुन अर्ज भरले आहेत. परंतु त्या प्रवर्गाच्या जागा नाहीत अशा उमेदवारांची उमेदवारी परिक्षा कमीटीने त्यांच्या शारिरीक चाचणी नंतरच्या पडताळणी पातळीवर रदद केलेली आहे. याची नोंद घ्यावी.

**'सदरचे गुण हे केवळ शारीरीक चाचणीचे गुण आहेत ,ही अंतिम गुणवत्ता यादी नाही. अंतिम गुणवत्ता यादी लवकरच प्रसिध्द करण्यात येईल'**

**पोलीस अधीक्षक,लोहमार्ग पुणे यांचे आदेशान्वये –**